कि. बा. हजारे (अण्णा)
K. B. alias Anna Hazare

राळेगण सिद्धी, तालुका पारनेर,
जिल्हा अहमदनगर (महाराष्ट्र)
पिन ४१४३०२
☎ (०२४८८) २४०४०१/२४०५८१
www.annahazare.org
www.joinannahazare.org.in

Ralegan Siddhi, Tal. Parner,
Dist. Ahmednagar (Maharashtra)
PIN 414302
☎ (02488) 240401 / 240581
annahazareoffice@gmail.com

# शुभसंदेश

सोनगाव ता. राहुरी सारख्या ग्रामीण भागातील डॉ. स्वप्निल माने यांनी वैद्यकीय शिक्षण घेऊन पुन्हा राहुरीसारख्या ग्रामीण भागात रुग्णांच्या सेवेसाठी रुग्णालय चालवले आहे. विशेषतः कॅन्सरसारख्या दुर्धर आजारातून रुग्णांना दिलासा देण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न चालविले आहेत ही बाब महत्त्वाची वाटते. मानवी जीवन हे सेवेसाठी आहे. मानवसेवा हीच खरी ईश्वरसेवा आहे. अशा निष्काम सेवेतून खरा आनंद मिळत असतो. शिक्षण घेतल्यानंतर व्यवसाय करताना जीवनात सामाजिक बांधिलकीच्या जाणीवेतून कार्य करणे म्हणजेच समाजाप्रति कृतज्ञता व्यक्त करणे होय. डॉ. स्वप्निल माने यांनी 'साईधाम''च्या माध्यमातून कॅन्सरच्या रुग्णांसाठी जी सेवा उपलब्ध करून दिली आहे त्यातून रुग्णांना आर्थिक आणि मानसिक आधार मिळेल असे वाटते. ते 'साईधाम कॅन्सर हॉस्पिटल'' सुरू करीत आहेत. त्या निमित्ताने प्रकाशित होत असलेल्या साईधाम या पुस्तिकेला आणि कॅन्सर हॉस्पिटलला हार्दिक शुभेच्छा.

धन्यवाद.

आपला,

कि. बा. हजारे (अण्णा)

कि. बा. तथा अण्णा हजारे